कोरोना विषाणू प्रसारास प्रतिबंधात्मक
उपाय म्हणून बायोमेंट्रीक उपस्थिती
प्रणालीचा वापर पुढील आदेशापर्यंत
तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्याबाबत.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे -पूर्व,मुंबई-४००० ०५१
जा.क्र./प्राधि/परिपत्रक/२०२०/706 /प्र.१५, दिनांक:- 13/03/2020.

परिपत्रक

भारत सरकारच्या आरोग्य तसेच कुंटुंब कल्याण मंत्रालयाच्या mohfw.gov.in या संकेतस्थळावर Novel Corona Virus चें अनुषंगाने बाायोमॅट्रीक प्रणालीमधून उपस्थिती नोंद करणेपासून सुट देण्याबाबतच्या निर्देशांबाबत कार्मिक, सार्वजनिक तक्रारी व निवृत्तीवेतन, मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील दि.०६/०३/२०२० रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनाचा उल्लेख करण्यात आला आहे. सदर ज्ञापनाद्वारे Novel Corona Virus (COVID-19) च्या प्रसाराला प्रतिबंध करण्यासाठी बायोमॅट्रीक प्रणालीमधून हजेरी नोंदविण्यासाठी सूट देण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) यांनी देखील त्यांचे दि.०५.०३.२०२० रोजीच्या परिपत्रकाद्वारे याबाबत समान प्रकारचे निर्देश दिलेले आहेत.

२. सबब, Novel Corona Virus (COVID-19) च्या प्रसाराला प्रतिबंध करण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून प्राधिकरण व प्रादेशिक मंडळामधील कार्यालयात, कार्यालयीन उपस्थितीची नोंद करण्यासाठी बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीचा वापर करण्यास पुढील आदेशापर्यंत तात्पुरत्या स्वरुपात सूट देण्यात येत आहे. तथापि, सदर कालावधीमध्ये कर्मचा-यांची उपस्थिती नोंदविण्याकरिता प्रत्येक विभागाने हजेरीपत्रक नोंदवही ठेवून त्यामध्ये अधिकारी/कर्मचा-यांच्या उपस्थितीची नोंद ठेवावी. सदरच्या उपस्थिती अहवालानुसार अनुषंगिक बाबीविषयी कार्यवाही करण्यात यावी.

३. तसेच मुंबई मंडळा अंतर्गत प्रनिस विभागाने आरोग्यविषयक सुरक्षीततेच्या दृष्टीने स्वच्छतागृहामध्ये पुरेश्या प्रमाणात स्वच्छताविषयक सामुग्रीं (सॅनिटायझर इत्यादी) उपलब्ध करून देण्याची तरतुद ठेवावी. तसेच भवन परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत दक्षता घ्यावी. तसेच उर्वरित प्रादेशिक मंडळांनी सुध्दा त्यांचेस्तरावर अशी दक्षता घ्यावी.

४. तसेच जनसंपर्क कार्यालयाने Novel Corona Virus (COVID-19) प्रसाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत तसेच घ्यावयाच्या खबरदारी बाबत योग्य प्रकारे भित्तीपत्रकाद्वारे म्हाडा मुख्यालय तसेच प्रादेशिक कार्यालयांमध्ये ठिक ठिकाणी प्रसिध्दी दयावी.

सदर परिपत्रक mhada.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./ प्रा.**
**यांचे निर्देशानुसार.**

**( प्रसाद उकर्डे )**
**सचिव/प्राधिकरण**

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**

१. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२. मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ/मुं इ दु व पू मंडळ,
३. मुख्य अभियंता-१/२/३/प्रा.
४. विधी सल्लागार/प्रा.
५. वित्त नियंत्रक /प्रा.
६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी /प्रा.
७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
८. मुख्य अधिकारी, मुं झो सु मंडळ/कोकण मंडळ/पुणे मंडळ/ नाशिक मंडळ/नागपूर मंडळ/औरंगाबाद मंडळ/अमरावती मंडळ
९. उपमुख्य अभियंता, दक्षता व गुणनियंत्रक कक्ष, पी.एम.ए.वाय./ बी.डी.डी.चाळ पुर्नविकास प्रकल्प /प्रा.
१०.चौकशी अधिकारी /प्रा.
११.सक्षम प्राधिकरण-१/२
१२.मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१३.मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान कक्ष /प्रा.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**

१. सहमुख्य अधिकारी/मुं.मंडळ/मुं.इ.दु.व पु. मंडळ
२. प्रशासकीय अधिकारी/प्रा./मुं.मंडळ/मुं.इ.दु.व पु. मंडळ/मुं.झो.सु.मंडळ/ कोंकण मंडळ/ पुणे मंडळ/ नागपूर मंडळ/ अमरावती मंडळ/ नाशिक मंडळ/ औरंगाबाद मंडळ.

**प्रत माहितीसाठी :-**

मा. उपाध्यक्ष/ प्रा. यांचे स्वीय सहाय्यक